पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १६

**सभावृत्तांत**

दिनांक - **२१/१२/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२१/१२/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.पवळे सुमनताई मधुकर
४. मा.संगिता(नानी)प्रभाकर ताम्हाणे
५. मा.कदम निकिता अर्जुन
६. मा.अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) दुरध्वनी चालक या पदावर कार्यरत असलेले सेवा ज्येष्ठ कर्मचाऱ्यांना दुरध्वनी पर्यवेक्षक पदामध्ये विलीन करणेबाबत – मा.मनिषा पवार, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.सुमन पवळे अनुमोदक – मा.मनिषा पवार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका विधी समितीची दिनांक २१/१२/२०१८ रोजीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०४/०१/२०१९ रोजी सकाळी ११.१५ वा. आयोजित करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

सभापती - शुक्रवार दि.०४/०१/२०१९ रोजी सकाळी ११.१५ वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १६

**सभावृत्तांत**

(दिनांक – २१/१२/२०१८ ची तहकूब सभा)

दिनांक - ०४/०१/२०१९ वेळ - सकाळी ११.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक २१/१२/२०१८ ची तहकूब सभा **शुक्रवार** दिनांक **०४/०१/२०१९** रोजी सकाळी **११.१५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे
४. मा.लांडगे राजेंद किसनराव
५. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
६. मा.अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.उषा ढोरे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका विधी समितीची दिनांक ०४/०१/२०१९ रोजीची तहकूब सभा मंगळवार दिनांक ०८/०१/२०१९ रोजी दुपारी १२.३० वा. आयोजित करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

सभापती - मंगळवार दि.०८/०१/२०१९ रोजी दुपारी १२.३० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १६

**सभावृत्तांत**

(दिनांक – २१/१२/२०१८ व ०४/०१/२०१९ ची तहकूब सभा)

दिनांक - ०८/०१/२०१९ वेळ – दुपारी १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ०४/०१/२०१९ ची तहकूब सभा मंगळवार दिनांक ०८/०१/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - सभापती
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.सागर बाळासाहेब गवळी
६. मा.पवळे सुमनताई मधुकर
७. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
८. मा.कदम निकिता अर्जुन
९. अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.वस्ते – प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०७/१२/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक - ७७ विषय क्रमांक - ०१

दिनांक – ०८/०१/२०१९

सुचक : मा. मनिषा पवार अनुमोदक : मा.निकिता कदम

संदर्भ – मा.मनिषा पवार, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील दुरध्वनी चालक या पदावर कार्यरत असलेले सेवा ज्येष्ठ कर्मचा-यांनी त्यांना २४ वर्षानंतर दुरध्वनी पर्यवेक्षक या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० मिळत आहे. तर प्रशासन विभागाने निर्गत केलेला आदेश क्र.प्रशा/१/कावि/९७/२०११ दि.०१/०२/२०११ अन्वये मुख्य दुरध्वनी चालक हे पद

वेतनश्रेणी र.रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन २८०० या कनिष्ठ पदामध्ये व वेतनश्रेणीमध्ये म्हणजेच दुरध्वनी चालक वेतनश्रेणी र.रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० यामध्ये विलीन/समायोजन केल्याने कनिष्ठ/नव्याने रुजु झालेल्या कर्मचा-यांना १२ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ पदाची म्हणजेच दुरध्वनी पर्यवेक्षक वेतनश्रेणी र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० मिळते तर सेवेने ज्येष्ठ असणा-या कर्मचा-यांना २४ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० मिळते. सदरची बाब आर्थिकदृष्टया ज्येष्ठ कर्मचा-यांवर अन्यायकारक असल्याने प्रशासन विभागाने निर्गत केलेला आदेश क्र.प्रशा/१/कावि/९७/२०११ दि.०१/०२/२०११ रद्द करुन नव्याने मुख्य दुरध्वनी चालक हे पद कनिष्ठ पदामध्ये व कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये विलीन केल्याचा आदेश रद्द करुन सदर पद वरिष्ठ पदामध्ये म्हणजेच दुरध्वनी पर्यवेक्षक वेतनश्रेणी र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० या पदामध्ये विलीन करुन सुधारित आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२२/२०१९
दिनांक : ०८/०१/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.